# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

## !!प्रकटन!!

**विषय :-** फेब्रुवारी–मार्च २०२६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांचे क्रीडा सवलतीचे प्रस्ताव ऑनलाईन सादर करणेबाबत

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचेशी संलग्न असलेल्या सर्व माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक/प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी व पालक यांना सूचित करण्यात येते की, शासन निर्णय क्रमांक – उमाशि–२०१५/प्र.क्र.२६२/एस.डी.२ , दिनांक २० डिसेंबर २०१८ नुसार माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांना व एन.सी.सी., स्काऊट गाईड मधील विद्यार्थ्यांना क्रीडा सवलतीचे गुण देण्यात येतात.

सदर शासन निर्णयानुसार जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडून कीडा प्रस्ताव तसेच एन.सी.सी. स्काऊट गाईड इत्यादी प्रस्ताव शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून दरवर्षी विभागीय मंडळाकडे सादर केले जातात.

त्याअनुषंगाने फेब्रुवारी – मार्च २०२६ च्या इ.१० वी व इ.१२ परीक्षेस प्रविष्ट खेळाडू विद्यार्थ्यांचे प्रस्ताव जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी दि. १५/०४/२०२६ पर्यंत संबंधित विभागीय मंडळाकडे आपले सरकार पोर्टलव्दारे ऑनलाईन पध्दतीने पाठवावयाचे आहेत.

तसेच एन.सी.सी., स्काऊट गाईड चे प्रस्ताव शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी विभागीय मंडळांकडे प्रचलित पध्दतीने दि. १५/०४/२०२६ पर्यंत पाठवावयाचे आहेत.

याबाबत सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी, सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) तसेच माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये मुख्याध्यापक/प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी, पालक, व सर्व संबंधित घटकांनी उपरोक्त बाबींची नोंद घेऊन त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

दिनांक २६/०२/२०२६

(डॉ.दिपक माळी)
सचिव
राज्यमंडळ, पुणे-४

क्र.कोविमं/माध्य.परीक्षा/ 880
कोल्हापूर -416004
दिनांक:- 02 MAR 2026

प्रति,

1. जिल्हा क्रीडा अधिकारी, सातारा, सांगली व कोल्हापूर.
2. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), सातारा, सांगली व कोल्हापूर.
3. प्राचार्य / मुख्याध्यापक,
   सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय व शाळा,
   सातारा, सांगली, कोल्हापूर

विषय:- फेब्रुवारी-मार्च 2026 च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांचे क्रीडा सवलतीचे प्रस्ताव ऑनलाईन सादर करणेबाबत


उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, फेब्रुवारी-मार्च 2026 च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांचे क्रीडा सवलतीचे प्रस्ताव ऑनलाईन सादर करणेबाबत राज्य मंडळ, पुणे यांचे वरील प्रकटनाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

(सुभाष रा. चौगुले)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर


## Sports Grace Marks System User Manual - Divisional Board Users

1. Open Board Official Website https://www.mahahsscboard.in/
2. Click on 'Board Employee Login'
3. Click on 'Sport Proposal Verification Login'
4. Login using below user IDs, please get the password from EDP Department, State Board

| Division Code | Divisional Board Name | Login ID |
|---|---|---|
| 1 | Pune | dsec1 |
| 2 | Nagpur | dsec2 |
| 3 | Chhatrapati Sambhajinagar | dsec3 |
| 4 | Mumbai | dsec4 |
| 5 | Kolhapur | dsec5 |
| 6 | Amravati | dsec6 |
| 7 | Nashik | dsec7 |
| 8 | Latur | dsec8 |
| 9 | Konkan | dsec9 |





5. Click on 'Cases Listing Report' menu, apply filters and export the list in excel.





6. Desk 2 approved marks are available in 'Cases Listing Report', perform the scrutiny of each application at Clerk Level, Branch Head Level and Final Authority Level and finalize the marks using the same login ID.
7. Once the marks are finalized, click on 'Scrutiny' menu and apply appropriate filters or search the application using 'Application ID' searching functionality.


8. Click on 'View Form' to view the application form; Click on 'View Documents' to view the documents uploaded; Click on 'View Payment Breakup' to view payment details.
9. Click on 'Scrutiny' button to finalize the marks on the application.





10. Click on the check boxes provided to verify the documents and Desk 3 marks. To edit the Desk 3 marks, click on 'Edit' button and select the appropriate options from the dropdown to update the marks.



11. Provide remarks and click on 'Approve Application' button.




12. Click on 'Division Wise Report' to export to excel the approved applications.




13. Coordinate with respective District Sports Officers and confirm that all the Sports Grace Marks applications are scrutinized.
14. After completion of scrutiny for all the applications, send the Seat Numbers and Final Marks to State Board for updation in result database.

## User Manual-१० वी व १२ वी क्रीडा प्रस्थाव भरण्यासाठी

### स्टेप 1: Aaple Sarkar पोर्टलवर प्रवेश करा

आपला वेब ब्राउझर उघडा आणि पुढील URL वर जा: https://aaplesarkar.mahaonline.gov.in


### स्टेप 2: नवीन वापरकर्ता म्हणून रजिस्टर करा

1. Aaple Sarkar पोर्टलच्या **होम पेज** वर "नवीन युजर ? येथे नोंदणी करा" या ऑप्शनवर क्लिक करा.
2. या बटणावर क्लिक करून रजिस्ट्रेशन प्रक्रिया सुरू करा.





### स्टेप 3: वापरकर्ता नाव आणि पासवर्ड तयार करण्यासाठी एक पर्याय निवडा

1. कोणताही एक पर्याय निवडा ज्याद्वारे तुम्ही वापरकर्ता ID आणि पासवर्ड )User ID आणि Password) तयार करू शकता, म्हणजे फोटो,ओळख प्रमाणपत्र तपासणीद्वारे किंवा मोबाईलवर OTP तपासणीद्वारे आपला वापरकर्ता प्रोफाइल तयार करण्याचा पर्याय दिला जाईल. आपल्याला जो पर्याय योग्य वाटतो तो निवडा.




### स्टेप 4: OTP तपासणीद्वारे वापरकर्ता नाव आणि पासवर्ड तयार करा

1. आवश्यक माहिती भरा आणि OTP तपासणीच्या मदतीने आपले वापरकर्ता नाव आणि पासवर्ड तयार करा.
2. आवश्यक माहिती भरल्यानंतर, **Register** बटणावर क्लिक करा.





रजिस्ट्रेशन यशस्वी झाल्यावर, खालील पुष्टीकरण संदेश दिसेल: **"Registration Successful!"**

1. यावरून आपले अकाउंट यशस्वीपणे तयार झाले आहे.
2. पुढे जाण्यासाठी **OK** बटणावर क्लिक करा.





### स्टेप 5: पोर्टलवर लॉगिन करा

1. रजिस्टर केल्यानंतर, आपले **वापरकर्ता नाव** आणि **पासवर्ड** वापरून Aaple Sarkar पोर्टलवर लॉगिन करा.
2. आपले क्रेडेन्शियल्स भरा आणि **Login** बटणावर क्लिक करा.




## स्टेप 6: लॉगिन केल्यानंतर विभाग निवडा

1. लॉगिन केल्यानंतर, डाव्या बाजूला विविध विभागांचे नाव दिसेल: कृषी, गृह विभाग, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग.
2. शालेय शिक्षण आणि क्रीडा विभाग निवडल्यावर, त्या विभागाशी संबंधित सेवा अर्जासाठी आपल्याला सूची दिसेल.
3. **"राज्य, राष्ट्रीय इत्यादी कार्यक्रमात सहभागी झालेल्या 10 वी आणि 12 वी विद्यार्थ्यांना क्रीडा गुण देणे"** हा पर्याय निवडा.




## स्टेप 7: अर्जाची प्रोफॉर्मा डाउनलोड करा


1. आवश्यक अर्ज फॉर्म डाउनलोड करा.
2. फॉर्म उघडा, आवश्यक तपशील भरा.


3. नियम आणि अटी वाचल्यानंतर **Agree** बटणावर क्लिक करा.





## स्टेप 8: अर्ज भरा आणि सबमिट करा

1. अर्जाच्या सर्व फील्ड्समध्ये अचूक आणि योग्य माहिती काळजीपूर्वक भरा.
2. फॉर्म पूर्ण झाल्यानंतर, **Submit** बटणावर क्लिक करा.
3. स्क्रीनवर **"Application Successful"** असा संदेश दिसेल.
4. पुढे जाण्यासाठी **OK** बटणावर क्लिक करा.








**स्टेप 9: आवश्यक कागदपत्रे अपलोड करा**

1. आपल्याला स्क्रीनवरील सूचना अनुसरण करून एक **Photo** आणि **Signature** अपलोड करावी लागेल.
2. सुनिश्चित करा की **Photo** आणि **Signature** दिलेल्या आकार आणि स्वरूपानुसार आहेत.
3. आवश्यक कागदपत्रे (उदा. हॉल तिकीट, प्रोफॉर्मा क्रमांक 1, 2, क्रीडा प्रमाणपत्र इत्यादी) अपलोड करा.





**स्टेप 10:**

1. Documents अपलोड केल्यावर, आपले अर्ज स्क्रीनवर दिसेल.
   पैशाची प्रक्रिया सुरू करणे
2. **आपल्या अर्जासमोर असलेल्या** Pay Now **बटणावर क्लिक करा**.




Make Payment **विंडो उघडेल.**




Make Payment विंडोमध्ये, आपला पैसे भरायला पुढे जाण्यासाठी Confirm बटणावर क्लिक करा.

• तुमच्या पेमेंटची यशस्वी प्रक्रिया झाल्यानंतर, तुमची अर्ज प्रक्रिया पूर्ण होईल.